# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

## अग्निशमन व आणीबाणी सेवा

जाहीर निवीदा क्र.०२/२०२३

---

कामाचे नाव :- मामनपा स्वमालकीच्या नागरी आरोग्य केंद्र, मदनी नगर येथे होज रील होज यंत्रणा मटेरिअल व मजुरीसह कार्यान्वित करणेबाबत.

प्राकलन रक्कम :- अंदाजे रु.२,५०,०००/- (अक्षरी : दोन लाख पन्नास हजार रुपये)

निवीदा फॉर्म किंमत :- ५१० + ९२ (GST) = रु.६०२/- (अक्षरी : सहाशे दोन रुपये)

बयाणा रक्कम :- रु.२५०० + ४५० (GST) = रु.२९५०/- (अक्षरी : दोन हजार नऊशे रुपये)

कामाची मुदत :- ३० दिवस

निवीदा धारकाचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्र. ------------------------------------------------------

------------------------------------------------------

------------------------------------------------------

------------------------------------------------------

प्रमुख अग्निशमन अधिकारी
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

आयुक्त
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

## अग्निशमन व आणीबाणी सेवा

### जाहीर निवीदा क्र.०२/२०२३

मा. आयुक्त तथा प्रशासक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव हे मनपाच्या स्वमालकीच्या नागरी आरोग्य केंद्र, मदनी नगर येथे होज रील होज यंत्रणा मटेरिअल व मजुरीसह कार्यान्वित करणेबाबत म.शासन मान्यताप्राप्त लायसन्स अभिकरण प्राप्त मक्तेदाराकडुन २ लिफाफा पध्दतीने मोहोरबंद निविदा मागवित आहोत. निविदेच्या कामाचे कोरे निविदापत्रक ख्वॉजा गरीब नवाज सेंट्रल फायर स्टेशन, जाखोट्या भवन, महेश नगर, मालेगाव जि. नाशिक येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सुट्टीचे दिवस वगळुन) विक्री कामी उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलन रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | निवीदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | स्वमालकीच्या नागरी आरोग्य केंद्र, मदनी नगर येथे होज रील होज यंत्रणा मटेरिअल व मजुरीसह कार्यान्वित करणेबाबत | २,५०,०००/- | २,५०० + ४५० (GST) = २,९५०/- | ५१० + ९२ (GST) = ६०२/- |

| | |
|---|---|
| जाहिर निवीदा प्रपत्र विक्री | दि. 11 / 01 /२०२५ स.11:00 ते दि.17 / 01 /२०२५ सं.18:00 पर्यंत |
| बिड प्रिपरेशन दिनांक | दि. 11 / 01 /२०२५ स.11:05 ते दि. 17 / 01 /२०२५ सं.18:00 पर्यंत |
| जाहिर निवीदा दाखल करण्याचा दिनांक | दि. 11 / 01 /२०२५, दु.12:00 ते दि. 17 / 01 /२०२५ सं.18:00 पर्यंत |
| जाहिर निवीदा उघडण्याचा दिनांक | दि. 18 / 01 /२०२५ (दुपारी १२.०० वाजे नंतर शक्य झाल्यास) |

Tender No. :

आलेल्या निविदा शक्य झाल्यास दि. 18 / 01 /२०२५ दु.१२:०० वाजेनंतर हजर मक्तेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी समोर उघडण्यात येईल. सदरच्या निविदा उघडल्यापासून ३० दिवस पर्यंत वैध राहतील. निविदेसंबंधी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे ख्वॉजा गरीब नवाज सेंट्रल फायर स्टेशन, जाखोट्या भवन, महेश नगर, मालेगाव जि. नाशिक येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

अटी – शर्ती :

अ) १. जाहिर निवीदा संबंधी सर्व माहिती अटी-शर्ती अग्निशमन विभागात उपलब्ध आहेत.

२. जाहिर निवीदा सादरीकरण हे २ लिफाफा पध्दतीने (Technical Bid & Commercial Bid) सादर करणे आवश्यक आहे.

३. जाहिर निवीदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक सो., मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांनी राखुन ठेवलेला आहे.

४. मनपा निश्चित करुन देईल त्या अटी-शर्ती लागु राहतील.

५. ठेकेदार / मक्तेदार यांनी स्वत:च्या अटी-शर्ती नमुद करु नये. त्या मनपास बंधनकारक नाहीत.

६. सदर कामासाठी ३० दिवस कामाची मुदत आहे.

प्रमुख अग्निशमन अधिकारी
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

आयुक्त
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

## अग्निशमन व आणीबाणी सेवा

जाहीर निवीदा क्र.०२/२०२३

**अ) लिफाफा क्र.१ साठी आवश्यक कागदपत्रे :**

१) निविदा बयाणा रक्कम भरल्याची पावती
२) संस्था नोंदणीचा दाखला
३) आयकर निपटारा अद्यावत प्रमाणपत्र
४) पॅन कार्ड छायांकीत प्रत
५) GST नोंदणी प्रमाणपत्र
६) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई येथील मान्यताप्राप्त लायसन्स अभिकरण असल्याचे प्रमाणपत्र
७) शासकीय अथवा खासगी संस्थेत काम केल्याचा पुरावा

**ब) लिफाफा क्र.२ :**

निवीदा धारकाने वरील निवीदेचे दर अंकीत व अक्षरी स्वच्छ अक्षरात भरावेत. दर पत्रकात खाडाखोड नसावी. खाडाखोड असल्यास निवीदेचा विचार केला जाणार नाही.

◆ **अटी-शर्ती :**

१) लिफाफा क्र.२ मध्ये म्हणजेच मुळ निवीदा लिफाफा यामध्ये मुळ निवीदा दरपत्रक ठेवावे. मुळ निवीदा पत्रकात खाडाखोड नसावी.
२) लिफाफा क्र.१ व २ सिल बंद करुन एकाच पाकीटात सिल बंद करावे. त्यावर कामाचे नाव व निवीदा धारकाचे नाव स्वच्छ अक्षरात लिहावे.
३) प्रथम लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल त्यामध्ये आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे अशी खात्री झाले नंतरच लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल. अन्यथा लिफाफा क्र.२ ना उघडता निवीदा रद्द समजण्यात येईल.
४) निवीदे सोबतची निवीदा धारकाची कोणतीही अट किंवा शर्त मान्य करता येणार नाही.
५) दिलेल्या मुदतीत संपुर्ण काम करुन देण्याची जबाबदारी निवीदा धारकाची राहील. तथापी कामा संदर्भात मुदतवाढ द्यावी किंवा कसे याबाबत मनपाचा निर्णय अंतिम राहील.
६) महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यास पुरवठा आदेश देतांना अलाहिदा अटी-शर्ती टाकण्यात येतील.
७) ज्यांची निवीदा मंजुर होईल त्यांनी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ नुसार आवश्यक त्या रक्कमेच्या मुद्रांकावर लायक जामीनदार देवुन करारनामा करुन द्यावा लागेल.
८) कोणत्याही अटी-शर्तीचा भंग केल्यास महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
९) सर्वात कमी दराची निवीदा स्विकारण्यात येईल.
१०) या निवीदेबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो वाद मालेगाव न्यायालयीन कक्षेत सोडविणे बंधनकारक राहील.

११) निवीदा दर पत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड केल्यास सदर निवीदा रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेला आहे.

१२) कोणतेही कारण न देता कमी अगर जादा दराची कोणतीही जाहिर निवीदा मंजुर करण्याचा अधिकार मालेगाव महानगरपालिकेने राखुन ठेवलेला आहे. तसेच जाहिर निवीदा संपुर्ण अगर भागश: मंजुर करण्याचा अधिकार महानगरपालिकेचा राहील. त्याबाबतची कारणे देण्याचे बंधन महानगरपालिकेवर राहणार नाही.

१३) सदर कामा संबंधीचे सर्व ज्या मध्ये विक्री, साहित्य, करारनामा, सेवा इ. सर्व कर ठेकेदाराने अदा करावयाचे आहेत. व अशा प्रकारचा कोणताही दावा मालेगाव महानगरपालिका, मालेगाव स्विकारणार नाही.

१४) काम सुरु करण्याचे आदेश मिळाल्यापासुन ३० दिवसात ठेकेदाराने सदर काम विहीत मुदतीतच पुर्ण करावयाचे आहे. याबाबत कोणतीही मुदत वाढ दिली जाणार नाही.

१५) दिलेल्या मुदतीत काम न झाल्यास अथवा कामास नकार दिल्यास किंवा निवीदेतील अटी-शर्तीत काही बदल करण्याची विनंती केल्यास अशा परीस्थितीत ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांनी राखुन ठेवलेला आहे.

१६) सर्व प्रथम लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. क्र.१ लिफाफ्यामध्ये मागणी केलेल्या कागदपत्रांची पडताळणी व खात्री केल्यानंतरच लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल. लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पुर्तता नसल्यास निवीदा नाकारण्यात येईल.

१७) होज रील होज यंत्रणेचे काम करीत असतांना लेबर चार्ज व इतर सर्व प्रकारचे कर हे स्वत: निवीदा धारकाने अदा करावयाचे आहेत. त्यास मनपा जबाबदार नाही.

१८) निवीदेतील नमुद होज रील होज यंत्रणेचे काम स्पेसिफिकेशन नुसार करणे आवश्यक असेल.

१९) कामात काही दोष आढळल्यास तो मुदतीत पुर्ण करुन द्यावा लागेल. नंतर काही ऑडीट ऑब्जेक्शन / शक निघाल्यास सर्व जबाबदारी निवीदा धारकाची राहील व तो रिकव्हरी भरण्यास पात्र राहील.

२०) निवीदा धारकाचे बील अदा झाल्यानंतर ६ महिन्यात काही त्रुटी आढळल्यास सुरक्षा रक्कमेतुन कपात करण्यात येईल.

२१) कोणत्याही कारणाने निवीदा तहकुब झाल्यास निवीदा धारक त्या विरुध्द कोर्ट केस, इतर ठिकाणी तक्रार करणार नाही. तसे केल्यास त्याची सर्व जबाबदारी मक्तेदारावर राहील.

२२) सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही मुदतीचे व्याज दिले जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| मक्तेदाराची सही | प्रमुख अग्निशमन अधिकारी | आयुक्त |
| मक्तेदाराचे नाव व पत्ता | मालेगाव महानगरपालिका, मालेगाव | मालेगाव महानगरपालिका, मालेगाव |

# निवीदा फॉर्म – ब (निविदा दर पत्रक)

| Sr. No. | Description (नागरी आरोग्य केंद्र, मदनी नगर) | Quantity | Unit | Supply Rate | Installation rate | Supply Amount | Installation Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A) | FIRE HYDRANT SYSTEMS | | | | | | |
| 1 | Supply & installation of G.I pipe with fitting | | | | | | |
| 1.1 | 100 mm Dia | 36 | Mtrs. | | | | |
| 1.2 | 80 mm Dia | 6 | Mtrs. | | | | |
| 2 | Single Hydrant Valve ISI - Supplying, Fixing And Testing Single Headed S.S Hydrant Valve Oblique Type With 75 mm NB Flanged Inlet and 63 mm Female Oblique Outlet With Blank Cap And Chain As Per IS 5290 With ISI Mark. | 2 | Nos. | | | | |
| 3 | SINGLE HOSE BOX -Supplying And Erectioning Of 18! Gauge, MS Sheet Of With Glaze Front Door Painted Red Colour Outside And White, Inside | 2 | Nos. | | | | |
| 4 | Hose Reel Drum – wall mounted M.S. fabricated drum with rubber hose of 20 mm dia & 20 Mtr. Long with nozzle. | 2 | Nos. | | | | |
| 5 | HOSE PIPE - Supply and testing of 63 mm dia 15 Mtr. Length with S.S Coupling bounded with GI wire. (8 kg working pressure). | 2 | Nos. | | | | |
| 6 | S.S Branch Pipe ( 12" Long ) | 2 | Nos. | | | | |
| 7 | Supply & installation of 450 LPM Kirloskar Booster Pump with starter and cable 40 Mtrs. | 1 | Nos. | | | | |
| 8 | Hose Reel Pipe - 30 Mtr. | 2 | Nos. | | | | |
| 9 | Fire Brigade Two - Way | 1 | Nos. | | | | |
| 10 | Installation Charges | --- | --- | | | | |

निवीदा धारकाचे नाव : - ------------------------------------------------------------

मक्तेदारची सही :- ------------------------------------------------------------

प्रमुख अग्निशमन अधिकारी
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

आयुक्त
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

For Office Use Only

प्रमुख अग्निशमन अधिकारी
मामनपा

लेखाधिकारी
मामनपा

लेखापरिक्षक
मामनपा

उपायुक्त (मु.)
मामनपा